
# विशाल दळवी



# चंदेरीगड ट्रेक

# चंदेरीगड ट्रेक

विशाल दळवी

ई साहित्य प्रतिष्ठान

चंदेरीगड ट्रेक

लेखक व छायाचित्रकार : ©विशाल दळवी.

vshldalvi.639@rediffmail.com

या पुस्तकातील लेखनाचे व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.
तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

©esahity Pratishthan® 2014

- हे पुस्तक लेखकाच्या परवानगीने ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध करून दिले आहे.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे विनामूल्य फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

छत्रपती शिवरायांच्या प्रत्येक किल्ल्याचा प्रत्येक बुरुज

जिवाची बाजी लावून राखणाऱ्या

त्या पोलादी दिलाच्या मावळयांना हे पुस्तक

सादर अर्पण

# चंदेरीगड ट्रेक

ट्रेकिंग म्हणजे नक्की काय हो??? हा प्रश्न मला आतापर्यंत अनेकांनी विचारला आहे. तुम्हालाही विचारला असेल. प्रत्येकजण आपापल्या परीने ट्रेकिंग म्हणजे नेमकं काय हे शास्त्रीयदृष्ट्या समजावून सांगण्याचा प्रयत्न करत असतो.  मी मात्र एकच उत्तर देतो. “माझ्यासाठी ट्रेकिंग म्हणजे निखळ आनंद....”  आणि हे निखळ आनंदाचे क्षण अनुभवायला अख्खं आयुष्य कमी पडेल इतके गड आणि किल्ले माझ्या या कणखर, राकट, दगडांच्या  देशात आहेत याचा मला सार्थ अभिमान आहे.....

मी आणि माझ्या मित्रांनी मिळून आमचा एक ग्रुपही तयार केला आहे ‘गिरीनाद’ नावाचा. आणि आमचं नेहमी कुठे न कुठे फिरणं चालूच असत. त्यामुळे मी अनेक प्रसिद्ध गडांना भेटी दिल्या आहेत. पण अनेक दिवसांपासून एका वेगळ्या गडाला भेट देण्याची इच्छा होती. जिथे कमी गर्दी असेल आणि एका थरारक ट्रेकिंगचा अनुभव घेता येईल असा गड. आणि तो योग लवकरच जुळूनही आला.  किशोर प्रभू (माझे भावोजी) यांना अनेक दिवसांपासून ट्रेकिंगला जाण्याची इच्छा होती. त्यांनी आमच्या ट्रेकचे फोटो आणि विडीओ पाहिले होते आणि पुढच्या ट्रेकला आमच्याबरोबर येण्याची सुप्त इच्छा बोलून दाखवली. परंतु एक आठवडा आधीच माहुलीगड ट्रेक आम्ही केला होता त्यामुळे आमचे गिरीनाद मेम्बर्स लगेच दुसऱ्या ट्रेकला येण्यासाठी तयार होतील याची शक्यता फारच कमी होती. शेवटी मी आणि विनायक भोसले (आपला लंगोटी यार... आणि कोणीही नाही आलं तरी प्रत्येक ट्रेकला एका पायावर तयार होणारा असा माझा सह्यासाथी) याच्याशी सल्ला  मसलत करून खास किशोर भावोजींसाठी एक ट्रेक करण्याचं आम्ही ठरवलं. आणि या वेळचं आमचं लक्ष्य होतं महाराष्ट्रातील एक कठीण आणि शारीरिक क्षमता जोखणारा ‘चंदेरीगड ट्रेक”......



माथेरान पर्वतरांगेच्या अगदी मध्यावर वसलेल्या चंदेरीगडाची  समुद्रसपाटीपासून उंची २३३० फूट इतकी आहे. चंदेरीगडाबद्दल  तशी फारशी माहिती उपलब्ध नाही. परंतु या गडाचा वापर सभोवतालच्या परिसरावर लक्ष ठेवण्याकरिता येत असावा. १६५६ मध्ये शिवाजी महाराजांनी कल्याण आणि सभोवतालचा परिसर काबीज केला तेव्हा या गडाचे स्वराज्यात आगमन झाले.

तर ६ जुलै हा दिवस ठरून आम्ही सकाळी ७ वाजता घाटकोपरवरून प्रस्थान करण्याचे ठरवले. आम्ही तिघेही घाटकोपरला राहतो त्यामुळे घाटकोपर रेल्वे स्टेशनला भेटण्याचे ठरवले. आम्ही तिघेही वेळेत पोचलो. पटापट तिकीट वगैरे घेऊन कर्जतला जाणारी जलद लोकल पकडली आणि आमचा प्रवास सुरु झाला.  आम्ही तिघेच असल्याने मनात फक्त एकच भिती होती की, तीन तीगडा काम बिगाडा नाही झालं म्हणजे मिळवलं..........




सकाळी ८ वाजून ३० मिनटानी आमचं त्रिकुट वांगणी स्टेशनवर दाखल झालं. घरून खाण्यासाठी काहीही आणलं नसल्याने स्टेशनवरच गडावर खाण्यासाठी खाऊ घेतला आणि वांगणी स्टेशनच्या पूर्व दिशेला निघालो. नेहमीप्रमाणे आपल्याजवळ 'गूगलबाबा' कडून उपलब्ध झालेली  सर्व माहिती बरोबर आहे का नाही याची शहानिशा करण्यास सुरवात केली. आम्हाला चंदेरीगडाजवळील चिंचवली गाव गाठायचे होते. त्यानुसार आम्ही चौकशी केली तेव्हा कळले की रिक्शाने जायचे झाल्यास जवळपास ५०० रुपये मोजवे लागतील. त्यामुळे आम्ही स्वता:हून तो पर्याय लाथाडला आणि आपल्या जिवाभावाच्या लाल डब्याला शोधू लागलो. तेव्हा एका माणसाकडून कळले की कर्जत-बदलापूर मार्गावरून एसटीने आम्ही चंदेरी फाट्याजवळ उतरून तिथून चिंचवली गावाकडे जाऊ शकतो. हा पर्याय मला योग्य वाटला. धावतच आम्ही जवळच असलेला कर्जत-बदलापूर हायवे गाठला आणि डोळ्यांवर विश्वासच बसेना, अहो एसटी चक्क तिथे उभी होती (जणू आमचीच वाट पाहत असावी). धावतच जाऊन एसटीत चढलो आणि वाटले पहिली पायरी यशस्वीपणे पार केली बुवा.... आणि अजून एक सुखद धक्का म्हणजे प्रती प्रवाशी तिकीट होतं अवघं ६ रुपये. (कुठे ते ५०० रुपये आणि कुठे हे ६ रुपये) क्षणभर वाटल ट्रेकिंग अजून ही महाराष्ट्रात जिवंत आहे याला एक प्रकारे आपली जिवाभावाची एसटी ही कारणीभूत आहे...

मी खिडकीतून डोकावून चंदेरी कुठे दिसतो का ते पाहत होतो. त्याची पहिली झलक पाहण्यासाठी मन अगदी आतूर झाले होते. पण धुक्यामुळे दूरवरचे स्पष्ट दिसत नव्हते. दहा-पंधरा मिनटांच्या एसटी प्रवासानंतर आम्ही फाट्यावर उतरलो. आणि कंडक्टर काकांना पुढचा रस्ता विचारून हायवेवरून डाव्या हाताला आत जाणाऱ्या डांबरी रस्त्यावरून चालण्यास सुरवात केली. चिंचवली गाव गाठण्यास आम्हाला पाऊण तास चालायचे होते.



सकाळी सकाळी त्या शांत वातावरणात मन अगदी प्रसन्न होऊन गेलं. आणि अशा वातावरणात चालताना अजिबात थकवा येत नाही हे विशेष... पाऊण तासानंतर आम्ही एका छोट्या गावात येऊन पोचलो. तिथे कसलंतरी बांधकाम चालू होतं. तिथे लाकडात प्रवेशद्वार पाहून मी अचंबितच झालो. ते प्रवेशद्वार खरच खूप सुरेख होतं.





**आणि तिथे फोटो काढण्याचा मोह किशोर भावोजींना काही आवरता आला नाही.**

गावात शिरल्यावर समोर नजर गेली ती चंदेरीगडाकडे. धुक्यात लपलेलं त्याचं ते गोंडस रूप पाहून क्षणभर त्याच्यावरून नजर हलवाविशीच वाटेना.......

पण गावात चौकशी केल्यावर कळले की हे तर चिंचवली गावच नाही मुळी....(अजून एक धक्का, पण हा सुखद नव्हता). आम्ही कोपऱ्याचीवाडी या गावात येऊन पोचलो होतो आणि इथून चिंचवली गाठायचे म्हणजे अजून अर्धा तास फुकट जाणार अस कळलं. पण आज जणू आमचं नशीब आमच्यावर मेहरबान होतं. एका गावकरी मुलाने सांगितलं की या गावातूनही एक वाट चंदेरीगडावर जाते. पण नवख्याला ती वाट लवकर मिळणे म्हणजे मुश्कील असे ही त्याने सांगितले. अशा आडवाटेने ट्रेकिंग करण्यातच खरी मज्जा असल्याने मी त्या वाटेने जाण्यास तयार होतो. मी विनायक आणि किशोरला विचारलं त्यांनीही जास्त आढेवेढे न घेता होकार दिला. त्या मुलाकडून सर्व वाट नीट समजून घेतली आणि चंदेरीगडावर चढाईस आम्ही सज्ज झालो.





**(कोपऱ्याचीवाडीतून चंदेरीगडावर जाणारी वाट)**

आम्ही ज्या वाटेने जात होतो ती वाट पुढे जाऊन चिंचवली गावातून येणाऱ्या वाटेला मिळणार होती. वाट धबधब्याची होती आणि बाजूला दाट झाडी पसरली होती. अजून तरी आम्ही बरोबर वाट कापीत होतो असे वाटत असतानाच अचानक समोर वाटच बंद झाली. (सकाळपासूनचा हा चौथा धक्का होता.) आता जे काही आम्ही आमच्या बुद्धीने करून ठेवलं होतं ते निस्तरण्याशिवाय पर्याय नव्हता. मग काय चालू झाल की वाट शोधण्याचं काम.... त्या किर्र जंगलात वाट शोधणं अवघड होतं. शेवटी सरळ नाकासमोर चालण्याचा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर झाला आणि आमची स्वारी निघाली झाडाझुडपातून, काट्याकुट्यातून... काही वेळाने आम्ही एका सपाट जागेवर आलो. इथून चंदेरीगड अगदी समोर दिसत होता. आणि उजव्या बाजूला होती म्हैसमाळेची पर्वतरांग. अजूनही आम्हाला वाट गवसली नव्हती. आम्ही चंदेरीगड समोर ठेऊन चालण्यास सुरवात केली. थोडा वेळ चालल्यावर आम्हाला त्या जंगलात बोलण्याचे आवाज ऐकू आले. आम्ही धावतच त्या आवाजाच्या दिशेने गेलो. तिथे एक गावकरी आपल्या कुटुंबासमवेत लाकडं तोडत होता. त्याला पाहताच जणू देवाने आमची मदत करायला याला पाठवलं आहे असं समजून मी ईश्वराचे मनोमन आभार मानले. त्या माणसाबरोबर बोलताना कळले की ईथुन कोणतीच वाट गडावर जात नाही. आम्ही पूर्णपणे त्या जंगलात वाट चुकलो होतो.

त्या भल्या माणसाने आपल काम बाजूला ठेवलं आणि आम्हाला चिंचवली गावातून येणाऱ्या वाटेवर सोडायला येण्यास तयार झाला. आम्हाला त्या वाटेवर जाण्यास तब्बल २५ मिनटं लागली. आणि त्याने ज्याप्रकारे आम्हाला वेडीवाकडी वळणे घेऊन, झाडाझुडपातून आणले होते त्यावरून मला तर शंभर टक्के खात्री झाली की ही वाट आम्हाला कधीच मिळाली नसती. शेवटी एकदाचे त्या पारंपरिक वाटेवर पोचलो. त्या माणसाचे अनेक आभार मानून आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो.



(शेवटी आम्ही ‘रस्त्यावर’ (वाटेवर) आलो.)

इथून पुढची वाट अतिशय सोप्पी होती. ठराविक अंतराने दगडांवर खुणा केल्या होता. त्याच वेळेस आमच्या मागून येणारा एक ट्रेकिंग ग्रुप आम्हाला भेटला. आम्ही त्यांच्याबरोबरच जाण्याचे ठरवले. (तेवढीच सोबत आणि पुन्हा वाट चुकू नये म्हणूनही). दहा- पंधरा मिनटानी आम्ही एका सपाट जागेवर येऊन पोचलो. ईथून समोरचा चंदेरीगड आणि म्हैसमाळेची रांग स्पष्टपणे पाहू शकत होतो.



आता यापुढे आम्हाला ट्रेकच्या सर्वात थकवणाऱ्या भागाशी सामना करायचा होता. इथून पुढे आम्हाला धबधब्याच्या वाटेने म्हणजेच चंदेरीच्या उत्तरेला आणि म्हैसमाळेच्या दक्षिणेला असलेल्या खिंडीतून  चढाई करायची होती. त्या वाटेवर येऊन आम्ही थोडी विश्रांती घेतली आणि निघालो- त्या वाटेवर असणाऱ्या उंच उंच दगडांशी दोन हात करायला.



**(धबधब्याची वाट)**

प्रत्येक पावलावर २-३ फुटांचे दगड उभे टाकले होते. कधी बाजूच्या लहान दगडांचा आधार घेत, तर कधी लांब लांब ढेंगा टाकत आम्ही एक एक दगड सर करत होतो. परंतु चढण काही केल्या संपत नव्हती. पावसाचे दिवस असूनही आभाळात एक साधा काळा ढगही दिसत नव्हता. आणि यात भर म्हणून की काय सूर्यदेवही जोराने तळपत होते. आमच्या जवळच पाणीही एव्हाना संपत आलं होतं. त्यामुळे प्रत्येक पाऊल मुश्किलीने टाकलं जात होतं.



इतक्यात आमच्या बरोबर असणाऱ्या ग्रुपमधील कुणा अवलियाने दगडातून वाहणाऱ्या पाण्याचा शोध लावला. आम्ही सर्वांनी आमचा मोर्चा तिकडे वळवला. पाणी काही जास्त नव्हतं. पण वाहतं स्वच्छ पाणी असल्याने पिण्यासाठी आम्ही ते वापरू शकत होतो. त्या थंड पाण्याचा गळ्याला स्पर्श होताच थोडासा थकवा दूर झाला.



**(एका अवलियाने शोध लावलेला पाण्याचा झरा)**

अजून फक्त थोडीशी चढण आणि धबधब्याची वाट संपणार होती. आम्ही जास्त वेळ न थांबता पुढे कूच केली. पुढे गेल्यावर वाट तर संपली, पण आमची परीक्षा मात्र अजून बाकी होती. पुढे थोडा जंगल पट्ट्याचा खड्या चढणीचा भाग होता. इथेही मगासारखं संपूर्ण शरीराचा उपयोग करून चढावं लागत होतं. आणि तीव्र उन्हामुळे तर अंगाची अजूनच लाही लाही होतं होती. त्यामुळे चढायला अधिकच कंटाळा येत होता.



**(जंगलातील अजूनच थकवणारी वाट)**

इतक्यात अचानक आकाशातून सुर्यदेवांचे अस्तित्व काळया ढगांनी नाहीसे केले आणि वातावरणात गारवा निर्माण झाला. आणि एका सरप्राईज प्रमाणे पावसाने रिमझिम रिमझिम बरसण्यास सुरवात केली. मनात आले की पावसात जावे, मनसोक्त भिजावे आणि उन्हाने त्रस्त झालेल्या शरीराला आराम द्यावा असे वाटत होते. पण त्या गर्द वनराईत ती इच्छा मात्र अपूर्णच राहिली. पाऊस वाढायच्या आत गडावर पोचले पाहिजे या विचाराने आम्ही भराभर चढण्यास सुरवात केली.

चंदेरीगड जवळील प्रदेशातील माती आणि खडक हे भुसभुशीत असल्याकारणाने इवल्याश्या पावसानेही वाट निसरडी झाली. आणि खडी चढण असल्याने आम्हाला आधार घेऊन चढावं लागत होतं. याचा परिणाम असा झाला की आमचे कपडे मात्र चिखलाने माखले गेले.



काही वेळाने पाऊसही थांबला. आणि आम्ही त्या जंगलातून बाहेर पडून पुन्हा मोकळया आभाळाखाली आलो. आणि चंदेरीगडाचे जवळून प्रथमच दर्शन झाले. समोर चंदेरीचा अजस्त्र सुळका आमची वाट पाहत होता.



अजून अर्धा तास तरी आम्हाला गडावर पोचण्यास लागणार म्हणून जास्त घाई न करता आम्ही ५-१० मिनिटांचा ब्रेक घेतला. सभोवतालचे दृश्यही नयनरम्य होते. बरोबर सोसाट्याचा वाराही सुटला होता, त्यामुळे अवघा क्षीण कुठल्या कुठे पळून गेला. एक छोटंसं फोटोसेशन करून आम्ही पुढे निघालो.



पुन्हा एकदा वाट ही खड्या चढीची होती. परंतु आता हार मानणे शक्य नव्हते. शक्य तितक्या वेगाने आम्ही चढण्याचा प्रयत्न करत होतो.



**(वाटेत एका दगडाजवळ कोण्या भक्ताने लिंबू, हार, कुंकू वाहिले होते.)**

एका बाजूला खोल दरी, दुसरीकडे अजस्त्र कडा आणि मधल्या या इवल्याश्या निसरड्या पायवाटेवर चालण्याचा थरार. त्याला बेभान वाहणाऱ्या वाऱ्याने चार चांद लावले. कित्येक दिवसांनी थरारक ट्रेक करण्याचा मनसुबा आज पूर्ण झाला.

(चंदेरीचा थरार)



(चंदेरीचा थरार)

समोर सुळक्याच्या पायथ्याशी लावलेला भगवा झेंडा डौलाने फडकताना दिसला. आणि आम्हा तिघांचा ऊर आनंदाने भरून आला. (आनंदाश्रू वगैरे नाही आले...नाहीतर उगाचच तुमचा गैरसमज व्हायचा). धावतपळतच आम्ही चंदेरीच्या अजस्त्र सुळक्याच्या पायथ्याशी येऊ पोचलो. आणि मागे वळून त्या उंचीवरून मागे नजर टाकली आणि निसर्गाची ती सुंदर नयनरम्य उधळण पाहून डोळयाचे पारणे फिटले. इतक्या कष्टप्रद चढाई नंतर उंचीवरून तो निसर्ग अनुभवण्यात एक वेगळीच मजा होती. कॅमेऱ्याचे क्लिक क्लिक आवाज येत होते. प्रत्येक जण तो सुंदर क्षण आपल्या कॅमेऱ्यात टिपण्यासाठी धडपडत होतं. (त्यात मी हीहोतो हे काही सांगण्याची गरज नाही).





(चंदेरीच्या सुळक्याचा पायथा)

चंदेरीगडावरून प्रशस्त प्रदेश नजरेच्या टप्प्यात येतो. गडावरून दक्षिणेला पेबचा किल्ला, माथेरानचे विहंगम दृश्य दिसते. तर उत्तरेला म्हैसमाळची रांग, नवरा-नवरी, तावली आणि मलंगगडाचे दृश्य दिसते.  छानसं फोटोशूट झाल्यावर आम्ही सुळक्याच्या पायथ्याशी असणाऱ्या गुहेकडे वळलो.

याच गुहेत देवी चांदेरीचे छोटेसे मंदिर आहे. या गुहेत रात्रीच्या वेळेस २०-२५ माणसांची झोपण्याची व्यवस्था केली जाऊ शकते. कोण्या गावकऱ्यानी एकत्र येऊन देवीच्या मंडळाची स्थापना केल्याचं बाजूलाच लावलेल्या फलकावरून कळत होतं.



(चंदेरीगडावरील गुहा)



गुहा आणि मंदिर सोडलं तर गडावर फारसं पाहाण्याजोगं काही नाही. गडाचा घेराही फार मोठा नसल्याने गड लगेचच पाहून होतो. (पण खरंच समोर दिसणारे निसर्गाचे दृश्य मन अगदी तृप्त करून टाकते.) किशोरला तिथेच थांबण्यास सांगून विनायक आणि मी जाऊन पाणी घेऊन आलो आणि छानश्या सुटलेल्या वाऱ्यासमवेत आमचा खाऊ खोलला आणि अगदी काही मिनटात पूर्ण संपवलाही. आम्ही ज्या ग्रुपबरोबर वर आलो होतो ते सुळक्याची चढाई करण्यासाठी जात होते. त्यांनी दिलेलं आमंत्रण आम्ही नाकारलं कारण आम्हाला पुन्हा घरी परतायचं होतं. आणि त्यावेळेस तरी आमची सुळका चढण्याची मानसिक तयारी नव्हती.

बहुतेक ट्रेकर्स चंदेरीगडाचा ट्रेक हा गुहेजवळच पूर्ण करतात.(आम्हीही तेच केलं.) कारण चंदेरी सुळक्याची चढाई करण्यास कातळारोहणाचे तंत्र अवगत हवे. आणि येत नसल्यास कोणा अनुभवी नेत्याच्या नेतृत्वाखालीच प्रयत्न करावा. चंदेरीचा माथा गाठण्यास कमीत कमी अर्धा तास हवा. माथ्यावर शिवाजी महाराजांचा सिंहारूढ पुतळा आहे आणि बाजूलाच एक छोटेसे शिवमंदिर हीआहे.

पुन्हा कधीतरी गडाला भेट देऊन माथा सर करायचा असे मी तेव्हाच मनोमन ठरून टाकले.

गडावर थोडावेळ आराम करून आम्ही संध्याकाळी ४ वाजता परतीचा मार्ग धरला. अजूनही वाऱ्याचा जोर ओसरला नव्हता. त्यामुळे उतरतानाही खूप धमाल येत होती.



(चंदेरीचा अजस्त्र सुळका)

दीड तासात आम्ही चिंचवली गाव गाठले. आणि पुन्हा एकदा गावातून चंदेरीगडाला मन भरून पाहिलं. पण अजून आमची परीक्षा काही संपली नव्हती. चिंचवली गावातून बदलापूरला जाण्यासाठी कोणतच वाहन उपलब्ध नव्हत. त्यामुळे गावकऱ्यानी सांगितल्याप्रमाणे आम्हाला ३ किलोमीटरवर असलेल्या 'भेडशी' गावी जाऊन काही होतं का हे पाहण्यावाचून पर्याय नव्हता. पण सकाळपासून चालून चालून किशोरला खूप थकवा आला होता. आणि त्यांचे पायही खूप दुखत होते. पण त्याही स्थितीत हार न मानता ते त्या गावापर्यंत चालले आणि आमचं नशीब चांगलं म्हणून आम्हाला त्या गावातून एक रिक्शा मिळाली आणि आम्ही वेळेत बदलापूर स्टेशनला पोचलो. पटापट जाऊन सीएसटी लोकल मध्ये जाऊन जागा पटकावली आणि सकाळपासून अविरतपणे चालणाऱ्या आणि शेवटपर्यंत आमची साथ देणाऱ्या आमच्या पायांना एकदाचा आराम मिळाला......पण मन मात्र अजूनही चंदेरीवरच घुटमळत होतं.......



कसे पोहोचाल???

मुंबईवरून मध्य रेल्वेने कर्जत गाडी पकडून बदलापूर किंवा वांगणी स्टेशन गाठावे. पुढे पायथ्याशी असलेल्या चिंचवली गावात जाण्यास अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

पुण्याहून येत असाल तर कर्जत हे मध्य रेल्वेचे स्टेशन गाठून, तेथून सीएसटी लोकलने वांगणी स्टेशनवर उतरून पायथ्याच्या चिंचवली गावात जावे.

गडावरील गुहेत राहण्याची सोय आहे.

नवख्यांनी पावसात हा गड टाळलेलाच बरा.......

पण निखळ आनंद अनुभवायचा असेल तर एकदातरी चंदेरीगडाला भेट तो बनती है बॉस!!!!!!



(आमचं त्रिकुट.....)

# ई साहित्य प्रतिष्ठान

दक्षिण भारत हा भव्य मंदिरांसाठी प्रसिद्ध आहे. एका एका मंदिराची उंची, भव्यता आणि श्रीमंती पहात आणि ऐकत रहावी. म्हणून तर पर्यटक दक्षिणेची मंदिरं पहायला जातात. दक्षिणात्य लोकांना या मंदिरांचा फ़ार अभिमान आहे. काहीसा गर्वही. असायलाच हवा.

पण ती मंदिरं उत्तरेहून आलेल्या आक्रमक वाटळीपासून सुरक्षित राहिली याचं श्रेय मात्र मराठी लोकांनी अभिमानाने घ्यायला हवं. मुघलशाही, कुतुबशाही, आदिलशाही अशा बड्या बड्या शाह्यांशी एक हाती मुकाबला करून आम्ही मराठ्यांनी तंजावर ते पेशावर मराठेशाही स्थापन केली. आमच्या या किल्ल्यांनी, आमच्या पूर्वजांनी, एक संरक्षक भिंत उभी केली म्हणून दक्षिण सुरक्षित राहिली. सर्वच मराठी जण लढाईला गेले असतील असे नाही. पण काहींनी रसद पोचवली असेल. आणि काहींनी घाम गाळून दणकट किल्ले बांधले असतील. थोडे थोडके नाही, तिनशेहून अधिक कडक किल्ले. शोभेचे नाही. रणकंदनी किल्ले. आमनेसामनेच्या युद्धात जिंकणं अशक्य असे किल्ले. प्रत्येक किल्ल्याची गुंतागुंतीची रचना. प्रत्येक किल्ल्याची वेगवेगळी शक्तीस्थानं. प्रत्येक किल्ला एक ऊर्जास्थान. एक शक्तीस्थळ. मुडद्यासारख्या मनालाही उभारी देईल असं. या किल्ल्यांचा आम्हाला गर्व आहे. हे किल्ले हे आमच्या तरुणांसाठी मंदिरंच आहेत. भवानीची शक्ती मंदिरं.

ई साहित्य प्रतिष्ठानने या प्रत्येक शक्तीस्थळाचं स्वतंत्र ई पुस्तक बनवण्याचं काम हाती घेतलं. म्हणता म्हणता हजार हात पुढे सरसावले. नचिकेत जोशी, माधुरी नाईक, अरविंद नाईक, पंकज घारे, ओंकार ओक, अशा तरूण लेखकांच्या फ़ळीत आता भास्कर नारकर, संकल्प चौधरी, विशाल दळवी असे ताज्या दमाचे शिलेदार सामिल होत आहेत. या पुस्तिकांतून नव्या ट्रेकर्सना मार्गदर्शन तर होतेच पण विदेशात असलेल्या किंवा वयानुरूप

ट्रेकिंगपासून दूर असलेल्यांना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळतो. त्यामुळे या पुस्तिका फ़ार आनंदाने वाचल्या जातात.

या पुस्तिका प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोहोचल्याच पाहिजेत. आम्ही त्यासाठी लाखों लोकांना या मेलने पाठवतो. पण कोट्यवधी मराठी लोकांपर्यंत त्या न्यायच्या तर त्यासाठी हजार हात हवेत. तुमच्या ओळखीच्या तरूण मंडळींना या अभियानात सामिल करून घ्या. त्यांचे ई मेल पत्ते कळवा. त्यांना पुस्तके द्या. आता ही पुस्तके मोबाईलवरही वाचता येतात. www.esahity.com वरून डाऊन लोड करा. शिवाय नवनवीन apps येत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठानचं app लवकरच येत आहे.

मराठी ही केवळ भाषा नाही. ती एक वृत्ती आहे. एक परंपरा. एक वारसा. त्याचं जतन करूया. सर्व राजकारणापासून दूर राहून. पुढच्या पिढ्यांना या समृद्ध वारशाचा लाभ घेऊ द्या. त्यासाठी पैसे नकोत. फ़ार वेळही नका देऊ.

कृपया आपल्या ओळखीच्या दहा मराठी मंडळींचे ई मेल पत्ते कळवा. आमचे VIP सभासद होण्यासाठी एवढंच पुरेसं आहे.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com